नं. ११५

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

ना/८८

लेखक आ. ला. आसेलकर

सन १८९८

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव भक्तसंकटनिरसन

३८

हें

आत्माराम लाडू आसेलकर,

यांनीं रचिलें.

पुणें अंबाप्रसाद छापखान्यांत छापिलें.

इ० सन १८९८.

(सर्व हक्क मालकानें आपल्या स्वाधीन ठेविले ...)

किंमत १० आणे

१५०

ना. ८

मराठी ग्रंथ संग्रहालय नं० ठाणें सन १८..

... पार्शी चाळीवर

संगीत

# भक्तसंकट निरसन नाटक.

हें

आत्माराम लाडू आरोलकर,

यांनीं रचिलें.

पुणें अंबाप्रसाद छापखान्यांत छापिलें.

इ० सन १८९८.

(सर्व हक्क मालकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत)

किंमत १० आणे.

# प्रस्तावना

रा० रा० अण्णा किर्लोसकर यांनीं संगीत नाटकें तयार केल्यापासून लोकांस त्याचाच नाद लागून गेला आहे. जिकडे जावें तिकडे गायन ऐकूं येतें. कुठें तबला फडकतो आहे, कोठें हार्मोनियम वाजतो आहे, कोठें चवघडा वाजतो आहे, कोठें सनईत संगीत गायन चाललें आहे. याप्रमाणें हें सर्व भरतखंड संगितमय होऊन गेलें आहे.

कोणती अमोलीक वस्तू पाहिली असतां जसा तिचा नाद लागावा तसा मला या संगीताचा नाद लागला. व एखादें नवीन नाटक रचावें अशी इच्छा झाली ह्मणून “भक्तसंकट निरसन नाटक” रचिलें व त्यात पद्यें घालून प्रसिद्ध करणार होतों. परंतु कांहीं अडचणीमुळें तें तसेंच राहिलें. ज्याप्रमाणें एखादी गोष्ट करण्याचें हातीं घेतलें, व ती अपुर्ती राहिली ह्मणजे जशी मनास ती पुरी करण्याविषयीं चुटपुट लागते. त्याप्रमाणेंच माझी स्थिती होऊन, वर लिहिलेलें नाटक प्रसिद्ध करण्याची मला उत्कंठ इच्छा प्राप्त झाली.

हें नाटक मी माझ्या वयाच्या १९ व्या वर्षीं रचिलें, परंतु कांहीं अडचणीमुळें तसेंच राहिलें ( हें वर

लिहिलेंच आहे). तें तीन वर्षांनीं आज ईश्वरकृपेनें छापण्याचा प्रसंग आला. माझी विद्वत्ता म्हटली म्हणजे मराठी पांचव्या इय्यत्तेपर्यंत शिकून इंग्रजी अभ्यास करायाला लागलों. तेव्हांपासून नाटक करण्याची इच्छा उत्पन्न झाली, व ती तडीस गेली. या पुस्तकांतील गुणावगुण वाचकांस अंतीं कळून येतील. यास लोक उदार आश्रय देतील अशी इच्छा धरितो. व ती ईश्वर पूर्ण करील अशी आशा आहे.

पुस्तककर्त्ता.

॥ श्रीगजाननप्रसन्न ॥

# संगीत भक्तसंकट निरसन नाटक.

## अंक १ ला.

पद. (या दक्षिणमार्गीं० ही चाल)

वंदन शिव चरणा ॥ आधिं ॥ नमुनी गजवद-
ना ॥ आधिं ॥ पार्वतीनाथा भाल लोचना
करिशी कामदहना ॥ आधिं ॥ हे भोलानाथा
करीं मी ही नाटकरचना ॥ या स्थळीं ॥ या-
स्तव येऊनी सत्वरी दे वरप्रसाद या दीना ॥
आधिं ॥ १ ॥

पद. (रमाकांत श्रीवासुदेव० ही चाल)

नारायणश्री शेषशाई तो सकलां सुख देवो ॥
धृ० ॥ सुरनर लागती ध्यानीं ज्याच्या ॥ सं-
कटहर्ता जो भक्तांचा ॥ ऐसा दानव रिपू जो
॥ सकलां रक्षुनी दुर्दिनपळवो ॥ सकलां० ॥१॥

साकी.

श्रीगजवदना मूषकवाहना रंग स्थलिं तूं येई ॥
विघ्ननाश तूं करुनी आतां दासा भयवर देई ॥
करद्वय जोडोजी ॥ आत्माराम लीन चरणीं ॥१॥

सु०—ही ईश स्तुती पुरे आहे. फार वेळ या
सभाजनांस तिष्ठत बसविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तर
आतां आपल्या प्रियेचें अनुमोदन घेऊन नाटकास आ-

रंभ करावा. (पडद्याकडे पाहून) प्रिये तिकडचें काम आटोपलें असल्यास इकडे ये पाहूं.

नटी— पद. (युगसमसखेदीन० ही चाल)

गृहकार्यी मग्न असतां येण्या कां कथियलें ॥ धृ० ॥ काय असे हेतू अपुला ॥ सत्वर करा कथन मला ॥ तैसे या रंगस्थलीं सुजन कां तरी जमले ॥ १ ॥

सु०— साकी.

कालिदासकृत नाटक पाहुनी जन हे फारची विटले ॥ यास्तव नूतन पाहण्याकारितां पाचारण मी केलें ॥ म्हणुनी हे आले ॥ आतां एक कार्य उरलें ॥ १ ॥

व तें कोणतें म्हणशील तर आजच्या प्रसंगीं या सभाजनाचें जेणेंकरून मनरंजन होईल असें कोणतें नाटक करावें, तेवढी सूचना कर. कारण, कोणत्याही कामांत भार्येचें अनुमोदन घेतल्याशिवाय काम होत नसतें. याकरितां तुझ्या आठवणींत एखादें असल्यास सांग पाहूं.

न०—एकावें महाराज दिंडी.

थोर तुमची नाट्य कल्पनाही ॥ विदित असे सभाजनांनाही ॥ नवीन तुमचा कथा भाग यातें ॥ दावुनी करूं चित्त रंजनातें ॥ १ ॥

आपलें "भक्त संकट निरसन नाटक" आज या सभाजनांस दाखवून त्याचें मन आल्हादीत करूं.

सु०—प्रिये, खरोखरच तें मी अगदीं विसरून गेलों होतो. परंतु योग्यवेळीं आठवण केलीस म्हणून बरें झालें. आतां जाऊन पात्रांची सिद्धता कर. इतक्यांत मी आलोंच पण—

साकी.

सुस्वरगायना सारखी वस्तू दुजी नसे या लो-
कीं ॥ म्हणुनी मधुर गायना करुनी सभाजनां
तोषित्र कीं ॥ झडकरी या आतां ॥ सखये
विलंब नच करितां ॥ १ ॥

न०—जशी आज्ञा.

पद. (सुटला पित्र दिशेचा० ही चाल)

हा सागर उचंबळोनी ॥ तुशार पडती कांठीं
येवोनी ॥ तैसा या संसाराचे घनी ॥ पडतां
होय त्याची धूळधाणी ॥ १ ॥ पोरेंवाळें रडती
घरीं ॥ मिळेना पोटभर भाकरी ॥ करावी
कुणाची चाकरी ॥ करुणा येऊं दे तुजला
हरी ॥ २ ॥

सु०—शाबास सखये शाबास.

साकी.

समयोचित तव गानपरीसुनी हर्ष मनी तो झा-
ला ॥ सखये पहा हा धीवर समुह समोरुनी
तो आला ॥ यास्तव चल जाऊं ॥ आपण
पात्रें तीं सजवूं ॥ १ ॥

(पडदा पडतो)

## प्रवेश पहिला.

रामया.

पद. (कोणी दावा मजसी० ही चाल)

श्रीहरी या दीनातें मासळी मिळूं दे ॥ धृ० ॥
याच कृपा वरुनी आम्हीं भरितो पोट घरीं
॥ परी समुद्र बहु खवळला कैसें करूं तरी ॥
देवा आतां यात या संकटीं धीर दे ॥ १ ॥
पोरंबाळें रडती निशिदिनी कांहीं न मिळे
खाया ॥ त्यांचे रडणें पाहुनी माझी दुःख करी
जाया ॥ देवा तूंची या दिनातें भक्ष्य मिळूं
दे ॥ २ ॥

(दगडू प्रवेश करितो)

द०— लावणी.

कोणीकड सांगतूं जातोस ॥ कां असा खिन्न
तूं दिसतोस ॥ धृ० ॥ या घोर जंगला मधून
॥ हिंडाया काय कारण ॥ जलदी सांग मज
लागून ॥ मीही येतों तुझ्या मागून ॥ १ ॥

रा०—मित्रा काय विचारतोस, माझं नशीब! घरांत तर कांहीं खायाला नाहीं व मुलाबाळांचें रडणें पाहून तर जिव असा तिळतिळ तुटतो कीं, काय सांगूं. म्हणून मी मासे धरण्याकरितां समुद्रास चाललों आहे. व तो तर फार खवळला आहे असें कळतें. परंतु प्रयत्नान्तीं परमेश्वर अशी जी म्हण आहे तिला अनुसरून वागूं, त्यांत ईश्वर यश देईल तर देवो. मी तर हा त्याच्यावर भार ठेवून चाललों आहे. आज जें कांहीं

मिळेल तें विकून मुलांचें पोषण केलें पाहिजे. त्यांचे ते हाल माझ्यानें पाहवत नाहींत.

द०—मित्रा, तुझी दीनावस्था पाहून मला फार कळवळा येतो. तर चल मीही तुला मदत करीन.

पद.

आम्ही मत्स्य धरायाला । जातों कीं समुद्रा-
ला । परि असे तो खवळला । उपाय काय
याला ॥ दैवावरीं हवाला । ठेवोनी वादळा-
ला । शांतविण्या दर्याला । आज स्तवूं ईश्व-
राला ॥ संकटीं आशा दिनांला । देईल तो
यशाला । वंदूनिया पदांला । आम्हीं प्रार्थू
सदां साला ॥ १ ॥

(समुद्रांत जाळें टाकतात).

रा०—मित्रा, तो पाहिलास कां केवढा मोठा मासा आहे. आज आपणास एवढा मिळाला म्हणजे बस.

द०—हो खरेंच.

पद. (कितीं सुंदर कंठा० ही चाल)

चाल धांवत जाळ्यांत येरे ॥ चल झट झट
झट ॥ धृ० ॥ आज तुला आम्ही धरूनश्यानी ॥
गट्ट करूं तुज थांब ॥ ये झट झट झट झट ॥१॥

(त्यांस मोठा मासा सांपडतो व चिरल्या नंतर त्यांतून दोन जिवंत बाळकें निघतात).

रा०—हें रे काय आश्चर्य! हीं माणसांचीं पोरें या माशाच्या पोटांत कोठून आलीं. ईश्वराची करणी अ-

गाध आहे. त्याचा कोणासही अंत लागणार नाहीं. मित्रा मी तर या संसारास कंटाळून येथें कांहीं तरी मिळेल म्हणून आलों त्यांत हीं आणखी दोन पोरं सांपडलीं. आतां यांचा संभाळ कसा करूं.

द०— लावणी.

ऐक सख्यारे सुचला मज एक विचार ॥धृ०॥
या या वनामध्यें राहतो एक साधू सज्जन तो
साचार ॥ १ ॥ आपण साला बाळेंहीं विकूं ॥
देईल धन तो फार ॥ २ ॥ या कृत्यामध्यें यश
देवो प्रभू ॥ मानूं त्याचे आभार ॥ ३ ॥

रा०—मित्रा, फार नामी युक्ति आहे, तर चल आतां आपण तिकडेच जाऊं.

( पडदा पडतो ).

## प्रवेश २ रा.

ऋषी. साकी.

सुंदर उपवन दिसत कसें हें मती कुंठितही होई
॥ विश्रांती येथें बैसुनी घ्यावी ऐशी इच्छा होई
॥ सखया चल जाऊं ॥ अपुल्या चित्तातें रमवूं ।१।

( बसतात )

पद. ( चारुदत्त मम प्राण० ही चाल )

नच ऐसी त्रिभुवनीं ॥ बाग वाटे दुजी मनी ॥
खचित स्वर्गाहुनी ॥ आणिली इथें पहा आ-
णिली इथें ॥ वाहतसे शीतळ ॥ वात किती
मंजुळ ॥ गात असे कोकिळ ॥ मधुर स्वरा का-

हुनी मधुर स्वरा ॥ नंदनवनिच्या बरोबरीची शोभाही याची ॥ वाटे आज मम मनीं ॥ बैसलों नंदनवनीं ॥ गेलें मन वेडावोनी ॥ पाहुनी ऐसी शोभा पाहुनी ऐसी ॥ १ ॥

मतिमंदा— पद. (हीच खरी मुर्ती तरी० ही चाल)

याउद्यानीं, तुज लागोनीं, शोभा पाहोनीं, वाटे मनीं, काय याक्षणीं, सांगे झणीं, वेळ न लावी आतां ॥ तर्क खरें, कथनकरी, झर झर झर झर झर झर झर झर झर झर ॥ १ ॥

म०—उपवनिची, शोभा अती, काय वर्णूं तीं, न कळे चित्तीं, माझी मती, कुंठे अती, ही शोभा पाहुनिया ॥ स्पष्टपणें गुरुजी कथितों तुम्हा ॥ नंदनवनाहुनी रम्यही बाग ॥ २ ॥

(इतक्यांत धीवर प्रवेश करितात).

रा० व द०—महाराज वंदन करतों.

ऋ०—कल्याण. तुम्हीं कोण व कोठून आलां व माझ्याजवळ काय काम आहे तें निवेदन करा.

रा०—महाराज, मी धीवर आहे. मासे धरून ते विकून त्यावर उपजीविका करीत असतों. आज मासे धरण्यास समुद्रावर गेलों तेव्हां एक मोठा मासा सांपडला, त्यास चिरून पाहतां हीं बाळकें आंत सांपडलीं. त्यांचा संभाळ माझ्यानें होणें कठीण म्हणून तुम्हाजवळ मी आणलीं आहेत.

ऋ०—कांहीं चिंता नाहीं, मी त्यांचा चांगल्या

रीतीनें संभाळ करीन (बाळें घेऊन) मतिमंद्रा त्या पांस इच्छित द्रव्य देऊन पाठव.

म०—जशी आज्ञा (जातात).

ऋ०— पद. (याचा वदन शशी० ही चाल)

रम्य यांची काया माझे मनीं भरली ॥ खचि
तचि ॥ धृ० ॥ गोंडस हे किती अवयव सुंदर
॥ मोहक तनु हां भासे प्रियकर ॥ तान भूक
हरली ॥ समयीं या ॥१॥ उभय मुलांचा जोडा
किती तरी ॥ भासे मजला प्रियकर अंतरीं ॥
मती माझी गुंगली ॥ पाहुनि या ॥ २ ॥

म०—(प्रवेश करून) महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें त्या धिवरास धन दिल्या नंतर तो फार खुष होऊन गेला.

ऋ०—बरें, या मुलांचा चांगल्या रीतीनें सांभाळ करून त्यांना कोणत्याच प्रकारचा त्रास न होईल असें कर.

(पडदा पडतो).

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

पाताळकेत— पद.

हे दीन वत्सला करी कृपा तूं आतां ॥ हो प्र-
सन्न चरणीं ठेवी तुझ्या मी माथा ॥ हे जग-
न्नायका शोधुं कुठें मी ताता ॥ मातेविण जिव
हा जाऊं पाहे मम आतां ॥ दे भेट सत्वर प्रि-

थकर मजला ताता ॥ प्राते मे जातिल प्राण तुम्हाविण आतां ॥ १ ॥

( अलुटकेत प्रवेश करतो. )

पा०—दादा, गुरुजीच्या कृपेनें तर आपण आनंदानें काळ घालवीत आहों. आजपर्यंत त्यांनी आपणास सर्व शस्त्र स्त्रें शिकविलीं. आपणास येथें कोणत्याच प्रकारचा त्रास नाहीं किंवा कोणत्याच गोष्टीची वाण नाहीं पण आज आपणास कांहीं विचारावें अशी माझी इच्छा आहे.

अ०—जी इच्छा असेल ती निर्दीत कर. जर मला माहीत असेल तर मी तुझी शंका फेडीन नाहीं तर आपण गुरुजीस विचारूं म्हणजे ते आपली शंका निवारण करतील. तर तुझी काय इच्छा आहे सांग पाहूं.

पा०—ऐकावें. दिंडी.

कोण्या वंशीं जन्म घेतला मी ॥ येथ कैसा येउनी राहिलों मी ॥ समस्त कळवुनी बाळका ची चिंता ॥ हरीं सत्वर मागणें हेंची आतां ।१।

अ०—बाळा, काय सांगूं माझ्यासुद्धां मनांत हेच विचार घोळत असतात. मी पुष्कळ दिवस गुरुजींस विचारीन म्हणतों परंतु तशी संधी येत नाहीं. आपणास येथें सुख मिळतें खरें पण जेव्हांपासून हे विचार माझ्या मनांत येऊं लागले तेव्हांपासून मनाची अशी कांहीं वृत्ती झाली आहे कीं काय सांगूं.

पद. ( या विमान्या करीं० ही चाल )

रात्रंदिन मज चैन पडेना सुचत नसे कांहीं ॥ कोण्या वंशीं जन्म पावलों माहित हें नाहीं ॥ समग्र कळल्या वांचुनी मजला चैन मुळीं नाहीं ॥ यास्तव यासी उपाय आतां करावा कायी ॥ जाउनी आतां गुरुजी कोठें बसले हें पाहीं ॥ ते तरी अपुल्या जन्माची कथा सांगतील कांहीं ॥ १ ॥

पा०—हा आलोंच पहा ( जाऊन परत येतो ) दादा, गुरुजी स्नानसंध्या आटोपून बसले आहेत तर आतां भेटण्यासही संधी बरी आहे.

अ०—चल तर आपली शंका निवारण करूं.

( जातात ).

## प्रवेश २ रा.

ऋ०— पद. (परमेश गजानन सकला० ही चाल )

जयश्री सांब उमारमणा ॥ देईं दर्शन या दीना ॥ धृ० ॥ मत्त पहाया निज भक्तांचें योग रूप तूं धरिसी ॥ प्रथम संकटीं घालुनी अंतीं चरणीं ठाव त्यां देसी ॥ १ ॥

आज फार वेळ झाला बाळें अझूनपर्यंत कां आलीं नाहींत. कोण आहेरे तिकडे, मतिमंदा, जा मुलास लवकर बोलावून आण.

म०—तींच आपल्या भेटीस आलीं आहेत.

ऋ०—जा त्यांस आंत घेऊन ये.

( जातो व बालकांसह प्रवेश करतो ).

पेठ

अ० व पा०—गुरुमहाराज, वंदन करतों.

ऋ०—कल्याण. बाळांनो, आज तुम्ही उदास कां दिसतां? तुमचा चेहरा पूर्वीप्रमाणें आनंदीत दिसत नाहीं याचें कारण काय? जी कांहीं इच्छा असेल ती पुरविण्यास मी तयार आहे.

अ०—महाराज, आपल्या कृपेनें आम्हांस कोणत्याच गोष्टीची उणीव नाहीं. असें असतां आम्ही चिंताक्रांत कां असूं आज क्रीडा करून फार दमलों म्हणून आपणास आमची मुद्रा खिन्न दिसली, दुसरें कांहीं नाहीं.

ऋ०—जरी तुम्ही माझ्याशीं लपवाल्पव केली तरी तुम्हांस चिंता उत्पन्न झाली आहे असें कळतें, तर जें काय असेल तें लवकर कथन करा. जर कोणी आपणास दुःख दिलें असेल तर त्यास या जगांतून नाहींसा करीन, मात्र बोलण्याचा उशीर.

अ०—महाराज, सांगतों ऐकावें.

पद. (पडे कां हा तरुण तुरुगांत० ही चाल)

**सकल गुरुजी पुसें मी वृत्त ॥ कोण असे मम तात ॥ मज्जन्माचें, कारण साचें, सांगुनी मन करी शांत ॥ धृ० ॥ जन्मापासुनी माय न पाहुनीं व्याकुळ मी अती झालों ॥ म्हणुनी लवकरी, वृत्त कथन करी, निवारी ही मम भ्रांत ॥ १ ॥**

ऋ०— पद. (मज न वदवे मम वाणी० ही चाल)

**काय कथूं मी मम मतीही गुंगुनी गेली ॥ तव**

त्वच हें परिसुनी ऐसें अशाया कालीं ॥ अशाया कालीं ॥ मम मतीही गुंगुनी गेली ॥ धृ० ॥ रावण तपें करुनी राज्याप्रत पावला ॥ कुंभकर्ण अचल निद्रापद लाधला ॥ विभीषण तो साधूपदीं लागला ॥ मेघनादें देवेंद्र जिंकियेला ॥ विभीषण तो शरणचि गेला ॥ स्वकुलाचा घात केला ॥ समरीं तव तात वधिला ॥ अशाया कालीं ॥ अशाया कालीं ॥ नच उरला कोणी वाली ॥

अं०—मज खड्गमय हें टोंची ॥ मत्प्राण जाऊं पाहाती ॥ कशी होईल गतीही पुढती ॥ अशाया कालीं ॥ अशाया कालीं ॥

अं०—ती जानकी कारण झाली ॥ १ ॥

तुमचा आजा रावण शंकरवरें राज्य करीत असतां इकडे अयोध्येंत असें झालें कीं, रामास राज्याभिषेक करावा असा दशरथ राजानें निश्चय केला, पण कैकयीस दशरथानें पूर्वीं दोन वर देऊं केले होते त्याची तिला आठवण होऊन तिनें राजाजवळ एका वरें भरतास राज्य व दुसऱ्या वरें रामास वनवास प्राप्त व्हावा असें मागितलें. हें रामास कळतांच पित्राज्ञा घेऊन सीता व लक्ष्मण यांसह वनवासास जाता झाला. त्या शोकानें राजा दशरथ मरण पावला. इकडे रामानें वानर सेना जमवून लंकेवर स्वारी केली, त्यावेळीं बिभीषण त्यास शरण गेला. तुझ्या बापास असा वर

होता की, जो चौदा वर्षे उपवासी असेल त्याच्या हस्तें त्याला मरण येईल त्याप्रमाणेच लक्ष्मणाच्या हातून त्याचा वध झाला. कारण, तो चौदा वर्षे निराहार राहिला होता. रामानें रावणादिकांचा वध करून बिभीषणास राज्याभिषेक केला. तुझी माता सती जाते वेळीं गरोदर होती म्हणून तिनें गर्भ समुद्रात फेंकून दिला, तो एका माशानें गिळिला. तो मासा एका धिवरास सांपडला व चिरून पाहतां आंत तुम्ही निघालां. त्याच्यानें तुमचें पोषण करवेना म्हणून मला अर्पण केलें तेव्हांपासून मी तुमचें लालनपालन करून कोणत्याच गोष्टीची उणीव पडूं दिली नाहीं.

अ०—तर मग. साकी.

दानव कुळीं जन्म आमुचा तात इंद्रजित तो ॥
पा०—कुंभकर्णासह मारुनी सांप्रत अयोध्येंत जो वसतो ॥
ऋ०—राजाराम वरें ॥ तोची शत्रू जाण खरें ॥१॥

पा०— पद. (कनक कांता त्यजुनी० ही चाल)

सर्वांगातें कंप सुटे होऊनी लाही ॥ होत भडका अग्नी परी तो आज मम देहीं ॥ तोषवीण्या पितर माझे आज या समयीं ॥ वधुनी त्याचें आणितों शिर गुरुजी हें पाहीं ॥ १ ॥

अ०— पद (वधुनी उपवना विरहामीची० ही चाल)

ऐकुनी वृत्त हें हृदयीं माझ्या अग्नी तो पेटला ॥ या समयीं मज कांहीं सुचेना वधण्याविण त्याला ॥ बिभीषणें त्या शरण जाउनी सर्व

घात केला ॥ दानवकुळीचें नाव बुडवुनी कु
लहंता बनला ॥ गुरुजी माझा कोप नावरे द्या
आज्ञा मजला ॥ जाउनी आतां छेदुनी आ-
णितों त्याच्या शिरकमला ॥ १ ॥

ऋ०—बाळा बोलणें सोपें पण करणें कठीण आहे. त्याचा सहाय कर्ता राम आहे व त्याचा पराक्रम तुला माहीत नाहीं तर सांगतों श्रवण कर.

पद. (भूपती खरे ते वैभव० ही चाल)

रामरायनो अवताराची विष्णुचा॥ कनिष्ठ बंधु
लक्ष्मणही शेषाचा ॥ प्रभू आज्ञेनें शंख धरी
भरताचा ॥ चक्रही तैसा वेश शत्रुघ्नाचा ॥
चाल ॥ हनुमंत मग्वा तो साचा ॥ ऐक तूं ॥
वध करशील कैसा साचा ॥ सांगतूं ॥ तूं ल
हान बाळक साचा ॥ ऐकतूं ॥ इंद्राहुनी ब
लाढ्य कुश पुत्र रामाचा ॥ लहू नामें असे तो
कनिष्ठ बंधू साचा ॥ १ ॥

इतके धनुर्धारी असतां तुम्ही त्यांच्यापुढें कसा टिकाव धराल!

अ०— पद. (मेरे गमकातराना सुनिये० ही चाल)

मत्पराक्रम आतां, दावीन ताता, या रामातें॥
जाउनी आतां, जिंकीन ताता, या रामातें॥धृ०।
पा०—ज्या दुष्टें मारविलें अमुच्या पितरा ठार
॥ त्यासी आधीं वधुनी मी पाह्या राज्यका-
रभार ॥ अलुटकेता, नेमीन ताता, जिंकीन
आतां, या दुष्टातें ॥ १ ॥

अ०—रामही येतां त्यासी दावीन स्वर्गाचें मी द्वार ॥ इतरा मर्त्यां फेकुन देईन सिंधु नदा पार ॥ काळही येतां, मारीन लाथा, जिंकीन आतां, त्या रामातें ॥ २ ॥

ऋ०—बाळा, हा दुराग्रह बरा नाहीं, मनुष्यानें करणें तें विचारानें करावें. रागाच्या आवेशांत कोणतीच गोष्ट करूं नये तिचा परिणाम वाईट होतो म्हणून मी सांगतों त्याकडे लक्ष देऊन कोप शांत कर.

अ०—ताता, तें कांहींही असो. ज्या दुष्टानें माझ्या वडिलाचा घात केला त्यास कधीं जिवंत राहूं देणार नाहीं. याक्षणीं त्याचा वध करून आपल्या भेटीस तडक येतों. तर आतां जाण्यास आज्ञा द्या.

ऋ०— पद. (कां मोडुनी मम माया० ही चाल)

कां तोडुनी मम आज्ञेला, अजीं बाळा, रणीं जासी सोडुनी मजला ॥ तूं खचित करित तव घात—

अ०—असुनी तव प्रीत, नाहीं मी भीत, आज्ञा द्या याला ॥ १ ॥

तर आज्ञा देऊन बालकांवर पूर्वीप्रमाणेंच कृपा असावी.

ऋ०—तुमची मर्जी. माझी तुम्हांवर पूर्ण कृपा आहे जा.

(पडदा पडतो).

घात केला ॥ दानवकुळीचें नाव बुडवुनी कु
ळहंता बनला ॥ गुरुजी माझा कोप नावरे द्या
आज्ञा मजला ॥ जाउनी आतां छेदुनी आ-
णितों त्याच्या शिरकमला ॥ १ ॥

ऋ०—बाळा बोलणें सोपें पण करणें कठीण आहे. त्याचा सहाय कर्ता राम आहे व त्याचा पराक्रम तुला माहीत नाहीं तर सांगतों श्रवण कर.

पद. (भूपनी खरे ते वैभव० ही चाल)

रामरायतो अवतारची विष्णुचा॥ कनिष्ठ बंधू
लक्ष्मणही शेषाचा ॥ प्रभू आज्ञेनें शंख धरी
भरताचा ॥ चक्रही तैसा वेश शत्रुघ्नाचा ॥
चाल ॥ हनुमंत सखा तो त्याचा ॥ ऐक तूं ॥
वध करशील कैसा त्याचा ॥ सांगतूं ॥ तूं ल
हान बाळक त्याचा ॥ ऐकतूं ॥ इंद्राहुनी ब
लाढ्य कुश पुत्र रामाचा ॥ लहू नामें असे तो
कनिष्ठ बंधू त्याचा ॥ १ ॥

इतके धनुर्धारी असतां तुम्ही त्यांच्यापुढें कसा टिकाव धराल?

अ०— पद. (मेरे गमकातराना सुनिये० ही चाल)

मत्पराक्रम आतां, दावीन ताता, त्या रामातें॥
जाउनी आतां, जिंकीन ताता, त्या रामातें॥धृ०।

धा०—ज्या दुष्टें मारविलें अमुच्या पितरा ठार
॥ त्यासी आधीं वधुनी मी पाह्या राज्यका-
रभार ॥ अलगकेता, नेमीन ताता, जिंकीन
आतां, त्या दुष्टातें ॥ १ ॥

अ०—रामही येतां त्यासी दावीन स्वर्गाचें मी द्वार ॥ इतरा सर्वां फेकून देईन सिंधु नदा पार ॥ काळही येतां, मारीन लाथा, जिंकीन आतां, त्या रामातें ॥ २ ॥

ऋ०—बाळा, हा दुराग्रह बरा नाहीं, मनुष्यानें करणें तें विचारानें करावें. रागाच्या आवेशांत कोण-तीच गोष्ट करूं नये तिचा परिणाम वाईट होतो म्ह-णून मी सांगतों त्याकडे लक्ष देऊन कोप शांत कर.

अ०—ताता, तें कांहींही असो. ज्या दुष्टानें माझ्या वडिलाचा घात केला त्यास कधीं जिवंत राहूं देणार नाहीं. याक्षणीं त्याचा वध करून आपल्या भेटीस तडक येतों. तर आतां जाण्यास आज्ञा द्या.

ऋ०— पद. (कां मोडुनी मम माया० ही चाल)

कां तोडुनी मम आज्ञेला, अजी बाळा, रणी जासी सोडुनी मजला ॥ तूं खचित करित तव घात—

अ०—असुनी तव प्रीत, नाहीं मी भीत, आ ज्ञा द्या याला ॥ १ ॥

तर आज्ञा देऊन बालकांवर पूर्वीप्रमाणेंच कृपा असावी.

ऋ०—तुमची मर्जी. माझी तुम्हांवर पूर्ण कृपा आहे जा.

(पडदा पडतो).

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

बिभीषण—

पद. ( रती विलास गंगे माझारी० ही चाल )

खचितची जानकी रामेहो मजलागीं धन्यचि
केलें ॥ रावणादिकां दुष्टां जिंकुनी मज रा-
ज्यचि अर्पण केलें ॥ आजवरी ईश कृपेनें हा
मी सुखें राज्य ते केलें ॥ या पुढती मुक्ति
वांचुनी हो मम मनीं तें कांहीं न उरलें ॥१॥

" आपण श्रीरामचंद्राचे फार आभारी आहोंत, त्याचे उपकार जरी आपल्या कातड्याचे जोडे करून त्याच्या पायांत घातले तरी फिटणार नाहींत. बरें प्रधानजी श्रीरामचंद्राच्या आज्ञेप्रमाणें कोणतीं कामें करीत असतां."

प्र०—शिवालयें, विष्णूमंदिरें स्वच्छ राखून देवां-दिकांस नित्य धूपदीप नैवेद्य पुजाऱ्या करवीं दाखवीत असतों. वाटसरांस तहान शमविण्याकरितां जागोजाग तळाव विहिरी बांधल्या आहेत.

बि०—सेनापती, आपली सेना कोणत्या विद्येंत निपण आहे व तिचा कोणत्याप्रकारें बंदोबस्त केला आहे.

सं०—महाराज, रथी, महारथी, अतिरथी आपाप-ल्या विद्येंत प्रवीण आहेत. खड्ग, गदा, तोमरादी धारण करवून नित्य त्यांची कवाईत घेत असतों व किल्यावर उत्तम शिपायी ठेवून चांगला बंदोबस्त केला आहे.

वि०—पुसना करण्याचें कारण हें की, कोणत्या वेळीं कसा प्रसंग येईल याचा नेम नाहीं. याकरितां आपल्याकडून होईल तितका बंदोबस्त ठेवावा.

प्र०—महाराज, आपण कांहीं काळजी करूं नका. श्रीरामचंद्राच्या कृपेनें आपलें सैन्य कसाही बलाढ्य शत्रू आला तरी त्यास जिंकील यांत संशय नाहीं.

(नारद प्रवेश करितात).

ना०— पद. (शोभा उपवनिची० ही चाल)

प्रभुपदीं रत होईं ॥ मना तूं त्याचे गुण गाईं
॥ धृ० ॥ स्थिती लयकर्ता तो नारायण तत्पदीं
रत होईं ॥ १ ॥ निजभक्तातें रक्षुनी तो प्रभू
अभयातें देई ॥ २॥ भवपाशातें तोडुनी अंतीं
चरणीं ठाव देई ॥ ३ ॥

वि०—(नमस्कार करून)

पद. (सकल मंत्री साह्य० ही चाल)

मुनिवर्या पूजाही ग्रहण करावी ॥
दासातें धन्य करुनी शांती धरावी ॥
आलां तुम्ही येथ आस धरुनी कोणती ॥
सांगा तुम्ही ब्रम्हर्षे त्वरित मजप्रती ॥ १ ॥

ना०—बिभीषणा तुझी भक्ति पाहून मी फार संतुष्ट झालों

पद.

धन्य धन्य तूं भक्त असशीवा बिभीषणा भूतलीं
॥ जननी तव धन्य तुला प्रसवली ॥ रामरायें
तुज प्रसन्न होउनी लंकाही दीधली ॥ तदाज्ञा
पूर्ण तुवां राखिली ॥ ऐसेंची तूं चालवी सत्कु-

या भीति नच तुजपुढीं ॥ विनायक तोचि तुला संभाळीं ॥ १ ॥

बि०—आपल्या दर्शनानें आज मी कृतकृत्य झालों आज आपलें आगमन कोठून झालें तें या दासास कळावें अशी इच्छा आहे.

ना०—अरे आमचें काय. आम्ही या तिन्ही लोकांत वास करणारे. आज स्वर्गांत पित्यामह बसलों असतां मनांत आलें कीं, मृत्युलोकात कसें काय चाललें आहे तें पाहावें म्हणून तडक इकडेच आलों. बरें आतां मी जातों. (जातात).

बि०— पद. (त्या मदन मनोरम० ही चाल)

नाथ आत्माराम पायीं मन माझें गुंतुनी गेलें ॥
निश्चिंत असा मी साचा होईनकीं त्यावेळे ॥ कधीं भेटेल राम माझा ऐसें हें मनीं आलें ॥चाल॥
रामराय पुण्य मोठयाचा ॥ आधारची साचा ॥
भेटेल यावेळे ॥ मन किती अस्थिर झालें ॥१॥

प्रधानजी रामचंद्राची माझी केव्हां गांठ पडेल असें झालें. मला कांहीं सुचेनासें झालें यास्तव चला आपण रमणबागेंत जाऊन मनरंजन करूं.

(जातात)

## प्रवेश २ रा.

अ०— पद. (झटपट पिओ मधुप्याे० ही चाल)

हा हा दुष्टा अधमा कठोरा ॥ त्वां मारिलें अमुच्या पितरां ॥ ध्रु० ॥ सजल्लासी कैसा बंधु

माराया ॥ शरण गेलासी मानव पाया ॥ योग्य नससीरे जिवंत रहाया ॥ अधमाहुनी तूं अधम खरारे॥ १ ॥

पाताळकेता आपण या निबिड अरण्यांत येऊन पडलों कोणीकडे जावें हें मुळीं समजत नाहीं. यावेळीं आपणास कोण मार्ग दाखवील.

( इतक्यांत नारद प्रवेश करितात ).

अ० व पा०—मुनें वंदन करतों.

ना०—कल्याण, तुह्मीं कोण व एथें कशाकरितां आलां तें सांगा.

अ०—महाराज, आह्मीं इंद्रजीताचीं मुलें. आमचें आजपर्यंत गुरुजींनीं पालनपोषण करून विद्या शिकविली. एके दिवशीं आह्मीं त्यांस आमचे आईबाप कोण म्हणून विचारतांच त्यांनी आम्हांस सर्व वर्तमान कळविलें. त्यामुळें आम्हांस कोप चढून आमच्या दुष्टांचा वध करण्यास चाललों तों मार्ग चुकून या निबिडारण्यांत येऊन पडलों तर आपल्याजवळ एक मागणें आहे.

ना०—जी इच्छा असेल ती सांगा, माझ्या हातून होण्यासारखें असल्यास मी करीन.

पद. ( मनि मौन्य आज कां तुम्हि० ही चाल )

पा०—मुनिवरा मार्ग तो नच ठावा ॥ दयानिधे याक्षणीं तुम्ही दावा ॥ घोरारण्यीं येऊनी फसलों ॥ नाहीं राहिलें भान ॥ धृ० ॥

या भीति नच तुजमुळीं ॥ विनायक तोचि तुला संभाळीं ॥ १ ॥

बि०—आपल्या दर्शनानें आज मी कृतकृत्य झालों आज आपलें आगमन कोठून झालें तें या दासास कळावें अशी इच्छा आहे.

ना०—अरे आमचें काय. आम्ही या तिन्ही लोकांत वास करणारे. आज स्वर्गांत पितामह बसलों असतां मनांत आलें कीं, मृत्युलोकांत कसें काय चाललें आहे तें पाहावें म्हणून तडक इकडेच आलों. बरें आतां मी जातों. ( जातात ).

बि०— पद. (त्या मदन मनोरम० ही चाल)

नाथ आत्माराम पायीं मन माझें गुंतुनी गेलें ॥
निश्चित असा मी साचा होईन कीं त्यावेळे ॥ कधीं भेटेल राम माझा ऐसें हें मनीं आलें ॥चाल॥
रामराय पूर्ण सौख्याचा ॥ आधारची साचा ॥
भेटेल या वेळे ॥ मन किती अस्थिर झालें ॥१॥

प्रधानजी रामचंद्राची माझी केव्हां गांठ पडेल असें झालें. मला कांहीं सुचेनासें झालें यास्तव चला आपण रमणबागेंत जाऊन मनरंजन करूं.

( जातात )

## प्रवेश २ रा.

अ०— पद. (झटपट पिओ मधुरया० ही चाल)

हा हा दुष्टा अधमा कठोरा ॥ त्वां मारिलें अमुच्या पितरां ॥ ध्रु० ॥ सजल़ासी कैसा बंधु

माराया ॥ शरण गेलासी मानव पाया ॥ योग्य नससीरे जिवंत रहाया ॥ अधमाहुनी तूं अधम खरारे ॥ १ ॥

पाताळकेता आपण या निबिड अरण्यांत येऊन पडलों कोणीकडे जावें हें सुद्धां समजत नाहीं. यावेळीं आपणास कोण मार्ग दाखवील.

( इतक्यात नारद प्रवेश करितात ).

अ० व पा०—मुनें वंदन करतों.

ना०—कल्याण, तुह्मी कोण व एथें कशाकरितां आलां तें सांगा.

अ०—महाराज, आह्मी इंद्रजीताचीं मुलें. आमचें आजपर्यंत गुरुजींनीं पालनपोषण करून विद्या शिकविली. एके दिवशीं आह्मी त्यांस आमचे आईबाप कोण म्हणून विचारतांच त्यांनी आम्हांस सर्व वर्तमान कळविलें. त्यामुळें आम्हांस कोप चढून आमच्या दुष्टांचा वध करण्यास चाललों तों मार्ग चुकून या निबिडारण्यांत येऊन पडलों तर आपल्याजवळ एक मागणें आहे.

ना०—जी इच्छा असेल ती सांगा, माझ्या हातून होण्यासारखें असल्यास मी करीन.

पद. ( मनि मौन्य आज कां तुम्हि० ही चाल )

पा०—मुनिवरा मार्ग तो नच ठावा ॥ दयानिधे याक्षणीं तुम्ही दावा ॥ घोरारण्यीं येऊनी फसलों ॥ नाहीं राहिलें भान ॥ धृ० ॥

अ०—मारविले आप्तबंधु माणखी मदिय तातें ॥ या दुष्टें राखिलें आमुचें काय नातें ॥ जाउनी या समयीं साचा शिरच्छेद करितों ॥ स्वपराक्रमें राज्य मी चालवीतों ॥

ना०—हाच मार्ग कीं लंके जातो ॥ सत्य सत्य तूं जाण ॥ १ ॥

ना०—तुह्मी तर लंके समीपच आलां आहां. या नीट वाटेनें जा ह्मणजे त्याच्या शहरा बाहेरील मैदानांत पोहोंचाल. यावेळीं तो रमणबागेंत विहार करण्यास गेला आहे. आतां मी जातों. (मनांत) आतां मात्र चांगलीच मजा होणार आहे. (जातात).

(पडदा पडतो)

(रमणबागेची शोभा पहात बिभीषण प्रवेश करितो).

बि०— पद.

मज दावा झडकरी माझ्या या प्रीय रामाला ॥ शून्य हें जग भासे त्यावीण मजला ॥ या नयनें मी सुंदर तनु ती पाहीन तरी केंव्हां ॥ कृपा करुनी तुम्ही आतां या पुरवा हेतूला ॥१॥

प्रधानजी, ही बाग इतकी रमणीय असूनही यापासून माझ्या मनास अगदींच आल्हाद होत नाहीं. (दचकून) आज माझा डावा डोळा कां बरें लवतो. कांहीं कळत नाहीं प्रभू रामचंद्राची मर्जी.

प्र०—महाराज, भीती धरण्याचें कांहीं कारण नाहीं मला वाटतें कीं, आपणास रामचंद्राची लवक-

रच भेट होईल असें हे शकून दर्शवीत आहेत.

बि०—प्रधानजी तुह्मी माझी कशी तरी समजूत करतां परंतु काय संकट ओढवतें कोण जाणें.

( इतक्यांत हेर प्रवेश करतो ).

हेर—सरकार. साकी.

कोट फूटला लंकापुरिचा उल्हाट यंत्रें सुटती ॥ दोन वीर ते रणीं दिसती शर संधाना करिती॥ आलों कळवाया ॥ क्षमा करावी राया।१।

बि०— पद. (वागवुनी मनीं न्याग० ही चाल).

रामचंद्रजीच्छेने येस्थळीं राज्यसूत्र चाळित मी असतां ॥ मत्सन्मुख अजि येण्यासाठीं शत्रूलानच भीति कशी ती ॥ जाउनी येक्षणीं रणांगणीं मी करितो त्यासीं ठार ॥ सितानाथ अजि यश देवो तो पाडुनी संकट पार ॥ १ ॥

सेनापतीस जाऊन सांग कीं, सेनेची तयारी करा. हे आम्हीं असेच आलों चल. ( जातात )

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( सिंहासनस्थ अलूटकेत ).

अ०— पद. ( शुद्ध बीजनेंन गुप्त० ही चाल )

अपुप सैन्य मारिलें मी शत्रुचें रणांगणीं ॥ जर्जर त्यां केलें मीं पराक्रमा दावुनी ॥ बिभिषणासीं जिंकुनी मी राज्यीं बैसलों ॥ गुरू कृपे करुनी आज धन्य जाहलों ॥ १ ॥

अ०—मारविले आप्तबंधु प्राणखीं मदिय तातें ॥ या दुष्टें राखिलें आमुचें काय नातें ॥ जाऊनी या समयीं याचा शिरच्छेद करितों ॥ स्वपराक्रमें राज्य मी चालवीतों ॥

ना०—हाच मार्ग कीं लंके जातो ॥ सत्य सत्य तूं जाण ॥ १ ॥

ना०—तुह्मी तर लंके समीपच आलां आहां. या नीट वाटेनें जा ह्मणजे त्याच्या शहरा बाहेरील मैदानांत पोहोंचाल. यावेळीं तो रमणबागेंत विहार करण्यास गेला आहे. आतां मी जातों. (मनांत) आतां मात्र चांगलीच मजा होणार आहे. (जातात).

(पडदा पडतो)

(रमणबागेची शोभा पहात बिभीषण प्रवेश करितो).

बि०— पद.

मज दावा झडकरी माझ्या या प्रीय रामाला ॥ शुन्य हें जग भासे त्यावीण मजला ॥ या नयनें मी सुंदर तनु ती पाहीन तरी केव्हां ॥ कृपा करुनी तुम्ही आतां या पुरवा हेतूला ।१।

प्रधानजी, ही बाग इतकी रमणीय असूनही यापासून माझ्या मनास अगदींच आल्हाद होत नाहीं. (दचकून) आज माझा डावा डोळा कां बरें लवतो. कांहीं कळत नाहीं प्रभू रामचंद्राची मर्जी.

प्र०—महाराज, भीती धरण्याचें कांहीं कारण नाहीं मला वाटतें कीं, आपणास रामचंद्राची लवक-

रच भेट होईल असे हे शकून दर्शवीत आहेत.

बि०—प्रधानजी तुह्मी माझी कशी तरी समजूत करतां परंतु काय संकट ओढवतें कोण जाणें.

( इतक्यांत हेर प्रवेश करतो ).

हेर—सरकार. साकी.

कोट फूटला लंकापुरिचा उल्हाट यंत्रें सुटती ॥ दोन वीर ते रणीं दिसती शर संधाना करिती॥ आलों कळवाया॥क्षमा करावी राया॥१॥

बि०— पद. (वागवुनी मनीं न्याग० ही चाल).

रामचंद्रजीच्छेने येस्थलीं राज्यसूत्र चाळित मी असतां ॥ मत्सन्मुख अजि येण्यासाठीं शत्रूलानच भीति कशी ती ॥ जाउनी येक्षणीं रणांगणीं मी करितो त्यासीं ठार ॥ सितानाथ अजि यश देवो तो पाडुनी संकट पार ॥ १ ॥

सेनापतीस जाऊन सांग कीं, सेनेची तयारी करा. हे आम्हीं असेच आलों चल. ( जातात )

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( सिंहासनस्थ अलूटकेत ).

अ०— पद. ( शुद्ध बीजनेंन गुप्त० ही चाल )

अमुप सैन्य मारिलें मी शत्रुचें रणांगणीं ॥ जर्जर त्यां केलें मीं पराक्रमा दावुनी ॥ बिभिषणासीं जिंकुनी मी राज्यीं बैसलों ॥ गुरु कृपे करुनी आज धन्य जाहलों ॥ १ ॥

आतां ज्याप्रमाणें आपल्या पित्याचा अंत झाला त्याप्रमाणेंच त्या मूर्खाचा या शस्त्रानें वध करतों. सेवका.

पद. (मंनतीसाठीं वरचेवर क्रां० ही चाल)

सत्वर जाउनी बंध करुनी दुष्ट बुद्धि त्या बिभीषणा ॥ मार देउनी प्रधानासह राजसभेपाजी आणा ॥ कोप चढे आज पाहुनी त्यांस फार स्वचित्तांत ॥ तत्स्त्रियांसी लावितों मी कराया आकांत ॥ वेळ न करितां जाऊन आणी त्यांस दरबारांत ॥ १ ॥

से०—जशी आज्ञा. (जाऊन बंदिवान केलेले बिभीषण व प्रधान यांसह प्रवेश करतो).

बि०— पद.

अरीने त्या मह्रा घाला ॥ मजवरी हा कसा अणिला ॥ भेट देई त्वरा करुनी ॥ मला आतां जगत्पाला ॥१॥ दीन दासाचें रक्षण ॥ करीं आतां येउनिया ॥ प्रभो अझुनी किती धरितां ॥ मनीं तुम्हीं अदयतेला ॥ २ ॥

अ०— झंपा.

घोर दुष्टा तुवां कर्म केलें ॥ सर्व आप्तांदिकां मारवीलें ॥ घृ० ॥ शरण जाउनी त्वां रामचंद्रासी त्या ॥ बांधिलें मम पिता, सूड त्याचा ॥ घेतला पाहुनी, सर्व पितरते मनीं ॥ हर्षतिल अहाबाहू स्फुरले ॥ १ ॥ (मारायास जातो).

पा०—दादा, असें अघोरकर्म करूं नका. अशा अमंगळ प्राण्याचा वध करून आपल्या शस्त्रास विटाळ

आणूं नका. यास बंदीखान्यांत पाठवून द्या ह्मणजे झालें.

अ०—बरें तुझ्या इच्छेप्रमाणेंच करतों. कोण आहेरे तिकडे.

से०—महाराज, हा आपला दास सेवेस हजर आहे. आज्ञा व्हावी.

अ०— पद. (निबिड अरण्यीं० ही चाल).

मार देउनी घोर दुर्गीं बंद करावें या चोरा ॥ रात्रंदिन तुम्ही सक्त रितीनें या वरती ठेवा पहारा ॥ दुष्ट प्रधाना नेऊन आतां सत्वर धाडा काल घरा ॥ योग्य हेंचि शासन यांना घेउनी जा तुम्ही करुनी त्वरा ॥ काळमुखी हा पाहण्या नको ॥ अति दुष्ट हरामखोराचा वीट येइतो ॥ त्वरा करा, नीच नरा, दृष्टि समोरुनी दूर करा ॥ १ ॥

(पडदा पडतो).

वि०— पद. (हा थोर असे संसार० ही चाल)

धांव त्वरें जानकीनाथ नकोरे पाहूं अंत ॥ प्रभु तूंच मला आधार, असें लाचार भेट दे त्वरित ॥ अलुटकेत येउनी मम राज्य, जिंकितो सहज ॥ सर्व सौख्यातें मुकुनी जाहलों बंदिवासी मी आज ॥ मजवांचुनी ममयुवती कशी राहे ॥ दुःख करिल प्रिया माझी येई मनीं हें ॥ आजवरी प्रीति दावून, राज्यीं बसवून, शेवटीं केलें मज दुःखित ॥ १ ॥

प्र०— पद. (मज सौख्य नसे रामा० ही चाल)

दे शेवटचा निरोप सख्यारे मजला ॥ अंतरे अभागी तुजला ॥ आज कैसा हा मजवरी घाला पडला ॥ दुर्दैवें वेळ साधिला ॥ चाल ॥ आजवरी रामरायानी॥ रक्षिलें प्रेमें करुनी ॥ परि सर्वहितें गेलें आज विलयाला ॥ काय होइल न कळे मजला ॥ १ ॥

प्र०—व्यर्थ शोक करून काय उपयोग जे दैवीं आलें तें भोगलेंच पाहिजे. आपण कांहीं चिंता करूं नये. हा सेवक फार लोभी आहे यास्तव यास मी आशा दाखवून तुमची सुटका करवितों ह्मणजे तुम्ही जोगी बनून रामास आपलें वृत्त कथन करा.

बि०—ही युक्ति बरी आहे.

प्र०—कांरे सेवका, मला मारून तुला काय मिळणार आहे. हें बघ, आमच्या महाराजांस सोडून दे व मला कारागृहांत घाल व राजास सांग कीं, प्रधानास मारून बिभीषणास कैद केलें. असें जर करशील तर तुझ्या शंभर पिढीस पुरेसें द्रव्य देईन.

से०—मी कबूल आहे चला.

(प्रधान व सेवक जातात)

बि०— पद. (अविचार खास नृपनाथा० ही चाल).

मत्करेंती रामसेवा नाहीं घडली ॥ म्हणुनी ऐसी निष्ठुरता ज्ञानें धरिली ॥ परी शत्रुनें मजशीं जिंकुनी अशा वेळीं ॥ रामपदीं सालीन व्हाया संधी दिधली ॥ १ ॥

रच भेट होईल असें हे शकून दर्शवीत आहेत.

बि०—प्रधानजी तुह्मी माझी कशी तरी समजूत करतां परंतु काय संकट ओढवतें कोण जाणें.

( इतक्यांत हेर प्रवेश करतो ).

हेर—सरकार. साकी.

कोट फूटला लंकापुरिचा उल्हाट यंत्रें सुटती ॥ दोन वीर ते रणीं दिसती शर संधाना क-रिती॥ आलों कळवाया॥ क्षमा करावी राया।१।

बि०— पद. (वागवुनी मनीं न्याग० ही चाल).

रामचंद्रजीच्छेने येस्थळीं राज्यसूत्र चाळित मी असतां ॥ मत्सन्मुख अजि येण्यासाठीं शत्रूला-नच भीति कशी तीं ॥ जाउनी येक्षणीं रणां-गणीं मी करितो सार्सी ठार ॥ सितानाथ अजि यश देवो तो पाडुनी संकट पार॥ १॥

सेनापतीस जाऊन सांग कीं, सेनेची तयारी करा. हे आम्हीं असेच आलों चल. ( जातात )

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( सिंहासनस्थ अलूटकेत ).

अ०— पद. ( शुद्ध बीजतेंन गुप्त० ही चाल )

अमुप सैन्य मारिलें मी शत्रुचें रणांगणीं ॥ ज-जेर सां केलें मीं पराक्रमा दावुनी ॥ बिभिष-णासीं जिंकुनी मी राज्यीं बैसलों ॥ गुरू कृपे करुनी आज धन्य जाहलों ॥ १ ॥

प्र०— पद. (मज सौख्य नसे रामा० ही चाल)

दे शेवटचा निरोप मख्यारे मजला ॥ अंतरे अभागी तुजला ॥ आज कैसा हा मजवरी घाला पडला ॥ दुर्दैव वेळ साधिला ॥ चाल ॥ आजवरी रामरायानीं॥ रक्षिलें प्रेमें करुनी ॥ परि सर्वहितें गेलें आज विलयाला ॥ काय होइल न कळे मजला ॥ १ ॥

प्र०—व्यर्थ शोक करून काय उपयोग जे दैवीं आलें तें भोगलेंच पाहिजे. आपण कांहीं चिंता करूं नये. हा सेवक फार लोभी आहे यास्तव यास मी आशा दाखवून तुमची सुटका करवितों ह्मणजे तुम्ही जोगी बनून रामास आपलें वृत्त कथन करा.

बि०—ही युक्ति बरी आहे.

प्र०—कांरे सेवका, मला मारून तुला काय मिळणार आहे. हें घर, आमच्या महाराजांस सोडून दे व मला कारागृहांत घाल व राजास सांग कीं, प्रधानास मारून बिभीषणास कैद केलें. असें जर करशील तर तुझ्या शंभर पिढीस पुरेसें द्रव्य देईन.

से०—मी कबूल आहे चला.

(प्रधान व सेवक जातात)

बि०— पद. (अविचार खास नृपनाथा० ही चाल).

मत्करेंती रामसेवा नाहीं घडली ॥ म्हणुनी ऐसी निष्ठुरता त्यानें धरिली ॥ परी शत्रुनें मजशीं जिंकुनी अशा वेळीं ॥ रामपदीं त्या लीन व्हाया संधी दिधली ॥ १ ॥

पद. (जातें रिपू वधावया० ही चाल)

अहा अयोध्येंत सा ॥ जातों प्रभुशीं शरण सा ॥ धृ० ॥ मधुर गान करुनिया ॥ आज मोहून सालें ॥ घेईं वचन तें ॥ दुष्टा वधावया ॥ युक्तीनें कार्य करुनी घेईन समई या ॥१॥

(पडदा पडतो).

## प्रवेश २ रा.

(वैरागी वेश धारण केलेला बिभीषण प्रवेश करतो).

पद. (जन्मा मी व्यर्थ आलें० ही चाल).

अहा जोगी मी बनलों ॥ प्रिय रघुनाथाचे शोधास्तव आलों ॥ हाय, हाय, हाय, हाय, अहा० ॥धृ०॥ अवचित मजवरी घाला पडुनी राज्यातें मुकलों ॥ हाल असे हे कुठवर सोसूं दुःख करूनी थकलों ॥ राज्य वैभवा सर्वस्वी मुकलों ॥ हाय, हाय, हाय, हाय ॥ १ ॥

वि०–(आपल्याशीं) पद (सुंदर तनुचा० ही चाल).

सर्व आप्तांचा सहवास, सुटुनी आजि खास, गळ्या येऊन पडलास, सोडुनी प्रीतिच्या रे जना ॥ नको दुःख करूं तूं मना ॥१॥ जा शरण त्वरें रामाला, पुरविल तव हेतुला, दुःख कथन कर त्याला ॥ नच मानी आतां खेदाला ॥ २॥ जाउनी लंकाभुवनीं, शत्रुसी वधुनी, देईल परतोनी, तुज राज्य धीरधर जरा ॥ नको होऊं तूं रे घाबरा ॥ ३ ॥

ईश्वरी करणी अगाध आहे तिचा कोणासही अंत

लागणार नाहीं. क्षणामध्यें रावाचा रंक झालों. देवा असा मजवर कां बरें कोप केला. असो, येणेंकरून तरी माझ्या रामाचें मला दर्शन घडेल एवढ्यानेंच मी धन्यता मानतों. मला या वेषांत कोणी ओळखणार नाहीं ना. छेः मला कोणी ओळखूं शकणार नाहीं.

पद. (प्राणसखी ममसुंदरी० ही चाल)

दे दे येउनिया सत्वरीं तूं भेट मला ॥ तुजवां-
चुनी आतां धीर न धरवे मजला ॥ तूंच सौ-
ख्याचा आधार असशी मजला ॥ म्हणुनी
सत्वर प्रभो येउनिया तारी मला ॥ १ ॥

पद. (नृप गुरु तैसे० ही चाल)

चैन पडेना तिळभरहि मज अस्थिर मन हें
किती झालें, कधीं पाहीन या नयनी हें ॥ न
कळे कोठें तो बसलाहे ॥ खरोखर होती प्राण
व्याकुळ हे ॥ प्रभु रामाविण अन्य न बरवें ॥
जिव आतां जाऊं पाहे ॥ कधीं० ॥ १ ॥

हे वृक्षांनो— पद. (शिवहर सांबसदाशिव० ही चाल)

माझा राम पाहिला काय ॥ कुणि तरी सांगा
हो ॥ धृ० ॥ ज्याच्या शौर्या नाहीं अंत ॥
शत्रू होती धैर्य रहित ॥ कोठें आहे जानकी-
नाथ ॥ माझा अंत पाहतां काय ॥ १ ॥ तया
विण मजसी नसे आधार ॥ करा मजवरी
तुम्ही उपकार ॥ मनी दुःख होत मज फार ॥
रडें मी धाय धाय ॥ २ ॥

या वृक्षांची मी इतकी विनवणी करीत असतां मला

कोणीच सांगत नाहीं ना. बरें आपण या हरिणास विचारून पाहूं.

पद. (रामस्मराचा राम० ही चाल)

बा हरिणा तूं सांग ॥ मजसी बा० ॥धृ०॥ धर्म बंधु तुज मानुनीं पुसतों ॥ निश्शंकपणें तूं सांग ॥ सख्यारे ॥१॥ राम माझा कोठें असे तो ॥ सत्य सत्य तूं सांग ॥ २ ॥

काय हा हरिण सुद्धां बोलत नाहींना, बरोबर आहे दैवच जर अनुकुल नाहीं तर तुह्मी तरी काय करणार.

(सेवक प्रवेश करतो).

से०—अहाहा काय या जोग्याचें रूप आहे. यक्ष गंधर्व कीं कोण असेल तो असो हें वृत्त आपल्या महाराजांस सांगितलें पाहिजे. बरें आपण यास विचारून पाहूं. (बिभीषणास उद्देशून) यती महाराज आपलें आगमन कोठून झालें व जायचें कोठें हें या दासास कळण्याची इच्छा आहे.

बि०—(मनांत) हा मनुष्य फार चांगला दिसतो. कदाचित् हा माझी व रामाची भेट करून देईल. (उघड) मी रामचंद्राची कीर्ति ऐकून त्यास भेटण्याच्या इच्छेनें आलों आहें तर मला त्यास भेटवाल काय ?

से०—आपली मर्जी असल्यास चला मी हें वर्तमान त्यांस कळवितों.

बि०—फार उत्तम आहे तुह्मीं त्यांस वर्दी देऊन या. (मनांत) आतां आपलें काम झालें.

पद. (जातें रिपू वधावया० ही चाल)

**अहा अयोध्येंत या ॥ जातों प्रभुसी शरण या ॥ धृ० ॥ मधुर गान करूनिया ॥ आज मोहून यातें ॥ घेईं वचन तें ॥ दुष्टा वधावया ॥ युक्तीनें कार्य करुनी घेईन समई या ॥ १ ॥**

(पडदा पडतो).

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

(कचेरी; सिंहासनस्थ राम, लक्ष्मण, वशिष्ट, कुश व लहू प्रवेश करितात).

रा०—लक्ष्मणा काल काशीहून ब्राह्मण आला, तो कोणत्या विद्येंत निपूण आहे व त्याची कोणत्या प्रकारची व्यवस्था केली आहेस.

ल०—महाराज, त्या ब्राह्मणाची गुरुजी करवी परिक्षा घेववून सर्व मान्य ठरल्यामुळें वर्षासन ठरवून आपल्या पदरीं ठेविलें आहे.

व०—रामा काय सांगूं, तो ब्राह्मण तर सर्व गुण संपन्न आहे व तसाच वेदवेदांत पारंगत आहे. त्याची प्रशंसा करावी तेवढी थोडी. त्यास वर्षासन ठरवून आपल्या पदरीं ठेविला आहे. असे पुरुष पदरीं असणें हें राजास एक भूषणच आहे.

रा०—मी कांहीं आपल्या आज्ञेबाहेर नाहीं. आपण जी व्यवस्था केली ती मला मान्य आहे.

(सेवक प्रवेश करतो).

से०—महाराजांचा जयजयकार असो.

रा०—काय वर्तमान आहे.

से०— पद. (महापराक्रमी विक्रम० ही चाल)

प्रभु चरणांचें दर्शन घ्याया रम्य जोगी द्वारीं आला ॥ निपुण गायनीं आहे तो बहु गाउनी रिझविल अपुल्याला ॥ वाटे मज गंधर्व दुसरा आजये स्थलीं तो आला ॥ आज्ञा होतां घेऊन येईन येथ त्यासी या समयाला ॥ १ ॥

रा०—जा त्यास त्वरा करून घेऊन ये.

से०—आज्ञा महाराज.

(जातो व बिभीषणासह प्रवेश करतो.)

बि०— पद. (महीवरी चित्रांगद० ही चाल)

जगीं सदा विजय असो तव भूपाला ॥ धृ० ॥
पाहुनी शौर्या तव तें राया असूर भीती मनीं ॥
तेहतीस कोटी देव लागती सदां तव चरणीं ।१।
प्रजापालनीं दक्ष अससी तूं चिंता वाहुनी मनीं ॥
प्रभुराया तव कीर्ति गाजो अक्षय त्रीभुवनी ।२।

ल०—योगी महाराज आपलें गायन ऐकावें अशी महाराजांची इच्छा आहे.

बि०—जशी आपली इच्छा.

पद. (नृपगुरु तैसे सुमंत० ही चाल)

काय मंतु मम करीतो घडला कोप कसा आला तुम्हाला हें मज न कळे अज्ञनां ॥ स्वल्पतरी विचार करुनी स्वमनीं ॥ ममापराध पदरीं घा-लोनी ॥ कृपा करावी दिनदासावरी हेंच वि-

नवितो आज ॥ दयाळा तत्पद मी वंदोनी॥१॥

पद. ( रुदनातें कां करिसी० ही चाल )

कां कोप असा तुम्हीं केला मजवरी निष्ठुर अजि बनला ।। ममापराध क्षमा करोनी द्या पदरीं मजला ॥ झडकरीं या ॥ करुनि माया ॥ सोडवीं या ॥ बहुत त्रासलों अजवरी देवा मुक्त करी मजला ॥ १ ॥

पद. (दिनरजनी वाट प्रिया० ही चाल)

प्रिय ललने सोडुनिया तुजसीं मी तरी ॥ भट-कतसें खचितचि मी या वनांतरीं ॥ काय गती तव झाली हें नसे मला ॥ माहितगे काय करूं जीव त्रासला॥अजवरी मी कसा तरी धीर धरियला ॥ ईश अतां मुक्त करिल मज कधीं तरी॥१॥

रा०—लक्ष्मणा. पद. (नृपदुहिते गे सुखवि मला० ही चाल)

रम्य दिसे हा यति मजला ॥ गाउनी रिझवी मन्मातिला ॥धृ०॥ मधुर ऐकुनी गान असें ॥ यावरी मम हें प्रेम बसे ॥ म्हणूनी झडकरी पूस वृत्तांताला ॥ १ ॥

ल०—यती महाराज, आपण या वयांत योगी कां बनलां हें कळण्याची महाराजांस इच्छा आहे ती तृप्त करा.

( चाल सदर. )

बि०—ईश प्राप्तिस्तव भूपाला ॥ वेश हा मी धारण केला ॥धृ०॥ कीर्ति ऐकूनी तव त्रीभुवनीं ॥ दर्शनेच्छा धरुनी मनीं ॥ आलों आतां दास धन्य झाला ॥ १ ॥

रा०—यतीराज आपलें वृत्त ऐकून मी फार खूश झालों. व आपलें पुन्हां एकवेळ गायन ऐकावें अशी इच्छा आहे

बि०—आपली इच्छा असल्यास म्हणतों.

पद. (जन्मा मी व्यर्थ आलें० ही चाल)

व्यर्थचि मी जगलों ॥ जन्मतांचि साहुनी कां
नाहीं मेलों ॥ राम, राम, राम, राम, व्यर्थ॥धृ०॥
राज्य वैभवा सर्वस्वी मुकुनी जोगी मी बनलों॥
सोसवेना दुःख मला हें मरणोन्मुख झालों ॥ स-
र्वस्वी सुखामी देवा अंतरलों ॥ राम, राम, राम,
राम ॥ व्यर्थ० ॥ १ ॥

(मूर्च्छना येऊन पडतो).

रा०— पद. (धांवा धांवा सख्यानो० ही चाल)

यासी उचला कोणी तरी त्वरा करूनी ॥ लव-
कर या, लवकर या, लवकर या, या ॥ हाय
हाय, हाय, हाय ॥ पडे जोगी हा येथें मुर्च्छा
येऊनी ॥ पाणी आणा करुनी त्वरा ॥ उठवा
तुम्ही यतीवरा ॥ ही याची स्थिती पाहवेन न-
यनीं ॥ लवकर या, लवकर या, लवकर या ॥
हाय, हाय, हाय, हाय ॥ पडे० ॥ १ ॥

(सेवक बिभीषणास नेतात).

रा०—लक्ष्मणा, तो जोगी गात असतां एकाएकी मुर्च्छित होण्याचें कारण काय बरें? त्याच्या भाषणा वरून असें वाटतें कीं, तो जोगी नसून त्यावर कांहीं प्रसंग गुदरल्या मुळें त्यानें हा वेश धारण केला आहे.

ल०—माझाही पण असाच तर्क आहे.

( सेवक प्रवेश करतो )

रा०—सेवका, तो जोगी नंतर कांहीं बोलला कीं नाहीं ?

से०—जेव्हां आह्मीं त्यास सावध करीत होतों तेव्हां त्यानें कांहीं दुःखोद्गार काढले परंतु आम्हास ते ऐकूं आले नाहींत.

रा०—बरें आतां तो कसा आहे ?

से०—आतां सावध झाला आहे व आपल्या भेटीस इतक्यांत येईल.

(बिभीषण प्रवेश करतो ).

बि०— पद. (अंजनपर्वा न करीं० ही चाल)

हा हा रामा आत्मारामा झडकरी येउनी सोडविया ॥ भक्त बिभीषण संकटीं पडला सत्वर आतां तारीया ॥ अलुटकेतें जिंकियलें मज फारचि जर्जर मी झालों ॥ त्राता मजसी कोणी नाहीं म्हणुनी तुजजवळी आलों ॥ अन्य तुजविना, वालीवा नसे ॥ म्हणुनी तुजला विनती करीतसे ॥ सुख दाता, मज त्राता, तूंच असशी हे रामा ॥ १ ॥

पद.

पदरीं घ्या तुम्हीं मजला ॥ दिनावरी कृपा करुनी विमला ॥ कशी नये दया, आज या समया ॥ निष्ठुर कां तुम्हीं बनलां ॥ १ ॥

ल०— पद. (ताल त्रीवट)

हा तो अपुला भक्त बिभीषण॥ दुर्दैवाने गेला त्रासून॥धृ०॥ कोण तुला गांजित असे तो॥ सांग लवकरी हा मी जातों॥ याक्षणीं जाउनी त्यासी वधितों॥ पुनरपी राज्यीं तुज बसवितों॥१॥

रा०— पद. (अविचार खार नृपनाथा० ही चाल)

सखा हा योग रुप धरुनी बहुत श्रमला॥ कोण दुष्टे तुजसी छळिलें सांग मजला॥ जाउनी आतां लंकाभुवनी॥ त्या दुष्टा वधुनी राज्यीं स्थापिन तुजला॥ १ ॥

तर वेळ न करतां कथन कर.

बि०—ऐकावें. पद (तव मानस कैसें काय० ही चाल)

लंकाती जिंकुनिया तुवां अर्पिली मजला॥ तव आज्ञेकरितां राज्य शत्रू मज जाहला॥ गुरुकृपेनें अलुटकेते करुनी शरांचा मार॥ जिंकुनी मजला दुर्गी ठेविलें टोंची हें मज फार॥ रामा शरण तुला॥ १ ॥

परंतु तेथून मोठ्या युक्तीनें सुटून कोणी ओळखूं नये म्हणून हा वेश घेऊन आलों.

कुश—ताता— पद.

या समयीं खचित लंकेला॥ जाऊनिया वधुं आम्ही त्यांला॥ त्या राक्षसद्वय बंधूला॥ पाठवूं पित्र भेटीला॥ चाल॥ पाठवा तुम्हीं आम्हांला॥ या समयीं तरी लंकेला॥ सांगतों स्पष्ट तुम्हांला॥ जाउनी करूं आम्हीं घात॥

यांचा समरांत ॥ करुनी युद्धाला ॥ पाठवीन यां स्वर्गाला ॥ १ ॥

लहू— पद. (स्वस्थ मंदिरीं ऐसे० ही चाल)

नको करूं तूं ध्यास ॥ सख्यारे ॥ धृ० ॥ या दुष्टासीं जाउनी आतां समरीं वधितों खास॥१॥ राही येथ तूं आनंदानें भोगीं पूर्ण सुखास ॥२॥

वशिष्ट— पद. (जबके कलंदर बनबन० ही चाल)

विचार आतां कसचा करितां लवकरी सिद्ध करा सेना ॥ जिंकुनिया या दोघांना राज्यीं बसवा बिभीषणा ॥ धृ० ॥

कुश, लहू०—लघू बाळकें हीं मारतील कोटींनां ॥ झडकरी पाठवुनी द्या यांना ॥ जिवंत धरुनी आणुं त्यांना ॥ १ ॥

बि०—शत्रू फार प्रबल आहेत ते आपणांस आटोपणार नाहींत. जोंपर्यंत गुरुची त्यांवर कृपा आहे तोंपर्यंत ते कोणाच्यानेंहि मारले जाणार नाहींत.

रा०— पद. (दूर दूर, दूर दूर० ही चाल)

धीर धर धीर धर, सिंहासनीं आज, बसवितों तुज ॥ धृ० ॥ आवडसी बहु कुशाहुनी मज ॥ जेर करुनी गुरुसी आज ॥ लंकेत जाउनी, शत्रुसी वधुनी ॥ सोडवितों तुज ॥ १ ॥

गुरुमहाराज मी रणास जातों आज्ञा असावी.

व०—विजयीभव

कुश— पद.

मारूं चला आतां शत्रूस लंकेत जाऊन ॥ त्याचें

मंदीर वेढून ॥ प्रताप दावीन त्यासी आतां छान छान छान ॥ करुनी मारहाण ॥ लावीन त्यासी करण्या आतां त्राण त्राण त्राण ॥१॥

(पडदा पडतो)

## प्रवेश २ रा.

रा०—लक्ष्मणा, आपण लंकेसमीप तर आलोंच आतां प्रथम त्या ऋषीचा शोध करूं.

ल०—या स्थलीं थोडी विश्रांती घेऊन नंतर मार्गस्थ होऊं.

(अलुटकेत पातालकेत प्रवेश करतात).

राम— पद. (जन्म कां वृथा दिला० ही चाल)

शस्त्रधर कुमार हा येतसे कुणाचा ॥धृ०॥
चालतसे मंद चाल ॥ मुद्रातीं फार लाल ॥
भासे माध्यानकाळ जैसा रवीचा ॥ १ ॥

आपण त्यास विचारूं ह्मणजे सर्व कांहीं कळेल (अलूटकेतास) मुला तुझें नांव काय व तुझे आईबाप कोण, हें सांगशील का?

अ०–ऐकावें. पद. (या दक्षिण प्रांतीं० ही चाल)

या लंके माजी, जयासी सर्व प्रजा राजी ॥ असे तीं ॥ ज्याचें दास्य करित होते देव नाना रीतीं ॥ भयानें ॥ ज्या मेघनादें, जिंकिला होता अमरपती ॥ इंद्र तो ॥ पुत्र तयाचा अलुटकेत तो मी रणामाजी ॥ उभा हा ॥ १ ॥

रा०—आणि बाळा तुझे कोण.

पा०— पद. ( पांडु नृपती० ही चाल )

इंद्रजीत ज्याचा पिता ॥ सुलोचना ती माता ॥ लंकाधिश अलुट्केत ॥ असे बंधु तो ॥१॥

आणि मला पाताळकेत म्हणतात.

रा०—लक्ष्मणा, आपण ज्यांचा शोध करतों ते अनायासें आपणास भेटले आतां येथेंच यांचा वध करून त्रिभीषणास सुखी करूं.

अ०—महाराज, आपलीं नांवें कळण्याची आम्हास इच्छा आहे.

ल०— पद. ( गुरुदत्त दिगंबर० ही चाल )

मुर्खा काय विचारिसी ॥ कैसें अज्ञुनी न जाणसी ॥धृ०॥ रावणादिकां समरीं वधुनी खल नाश जयें केला ॥ सुवर्ण लंका करुनी राज्यीं बिभीषण बसविला ॥१॥ त्यासी तुवां जिंकिलें म्हणुनियां कोप बहुतची चढला ॥ तुम्हां वधाया पुत्रांसह तो आज ये स्थळीं आला ॥ राजाराम वरें ॥ मी लक्ष्मण जाण खरें ॥ २ ॥

अ०—त्या बिभीषणाचा कैवार घेऊन तुम्हीं आलां काय. तुम्हांस याच वेळीं यमाच्या सदनीं पाठवतों. आज गुरु कृपेनें प्रसंग चांगला आला आहे.

रा०—व्यर्थ बडबड करूं नको. दांतीं तृण धरून शरण ये नाहीं तर आज तुझीं शंभर वर्षे भरलीं म्हणून समज.

( युद्ध होतें व आटोपत नाहीं असें पाहून ) लक्ष्मणा यांच्यावर गुरुची अवकृपा झाल्याशिवाय हे मरायचे नाहींत तर प्रथम आपण तिकडे जाऊं (जातात).

अ०—पाताळकेता, ते मानव एकाएकीं अदृश्य झाले. कांहीं चिंता नाहीं ते येथेंच कोठें तरी असतील आपण त्यांचा शोध करूं. (जातात).

(पडदा पडतो)

# अंक ६ वा.

## प्रवेश १ ला.

(चिंताक्रांत झालेला ऋषी प्रवेश करतो).

ऋ०— पद. (गेली सोडुनी० ही चाल)

गेली बाळें ती सोडुनी मजला ॥ किती आग्रह त्यांनी तो धरिला ॥धृ०॥ शोध न लागे त्यांचा मजला ॥ किती आवरुनी धरूं मी शोकाला ॥ म्हणुनी अवनी वरी ॥ कुठें भटकूं तरी ॥ त्यां पाहुनी सुख होईल मजला ॥ १ ॥

(राम प्रवेश करतो).

रा०—गुरुमहाराज, वंदन करतों.

ऋ०–विजयोस्तु. पद. (धरुनी कांहो वनी० ही चाल)

कवण वंशीं जन्म जाहला ॥ कथीं नामाभिधानाला ॥ काय इच्छा धरुनी आलां ॥ कळूं द्या येक्षणीं मजला ॥ १ ॥

रा०— पद. (व्यर्थ दुःख हें तुम्ही० ही चाल)

विनंती माझी श्रवण करा हे मुनीवरा ॥ रामचंद्र विनवित हा जोडुनी करा ॥ अलुटकेत त्रास देत सकल जनाला ॥ सर्व लोक, करीती

**शोक ॥ म्हणुनी तुम्हीं यांजवरी अवकृपा करा १**

महाराज अयोध्येचा राजा रामचंद्र तोच मी. आपण अलुटकेत पाताळकेत यांस वर दिल्यामुळें ते गोब्राह्मणास फार त्रास देतात. त्यांनीं तुमच्या कृपेनेंच येवढें बंड माजवलें आहे करतां तुम्हीं त्यांवर अवकृपा करा ह्मणजे झालें. दुसरें कांहीं मागत नाहीं. राक्षसांवर कृपा करून गोब्राह्मणास त्रास देणें आपणास उचित नाहीं.

ऋ०— पद. (शुंन्य का भासे० ही चाल)

**काय तूं वदसी ॥ असें हें ॥धृ०॥ पुत्रांसम मी आजवरी यांना ॥ रक्षिलें पुरवुनी चोज नाना ॥ विपरित मसलत देसी आज तूं कशी ॥१॥**

ज्यांस मी पुत्रांप्रमाणें आजपर्यंत लहानाचें मोठें केलें त्याचा स्वहस्तें घात करूं काय. हें कदापि होणें नाहीं.

रा०—जर आपली इच्छा नाहीं तर युद्धास सिद्ध व्हा. तुम्हांसच आधीं स्वर्गी पाठविलें ह्मणजे ते जातात कोठें.

ऋ०—फार उत्तम आहे (युद्ध करून जर्जर होतात व लाथ आपटतात तोंच वीर प्राप्त होतो).

वीर— पद.

**काय असें संकट पडलें तुम्हावरी येउनी ॥ चिंताक्रांत मुद्रा दिसे तुमची मज लागुनी ॥ जो कराल हुकुम तो येईन बजाउनी ॥ स्वर्गाहि उलथितां वेळ न मज लागुनी ॥ यास्तव सत्वर कथन करा तुम्ही जाईन आतां येथोनी॥हुकूम होतां आणिन येथें इंद्रही मुसक्या बांधोनी ।१।**

ऋ०— पद. (या तीक्ष्ण शस्त्रें करुनी० ही चाल)

या मनुजांनीं त्रास मला ॥ येथ येउनी बहु दिधला ॥ म्हणुनी कथितों मी तुजला ॥ यां पाठवी सत्वर स्वर्गाला ॥ १ ॥

वीर—आज मी तुम्हां सोडवितों ॥ हट्ट याचा पुरवीतों॥ रे मनुजा तुजमी वधितों ॥ या शस्त्रें काळीज फोडितो ॥ कर कर कर कर कर चावुनी खातों ॥ २ ॥

(रामाच्या अंगावर धाऊन जातों).

राम-(त्याची गचांडी धरून) पद.

अधमा मूढा तुजमी आतां या शस्त्रें मी छेदीतों ॥ या क्षणी तुज सोडविण्याला कोण येतो तो पाहतां ॥ भेटला नच मज सम शत्रू खचितची तुजला अज वर्णितो ॥ शरण येउनां नाक घांस तरी या समयीं तुज सोडितो ॥ चाल ॥

वीर—लीन मी असें । हे दयावरा ॥ मुक्त तुम्हीं करा । दीन पामरा ॥ दास मी तुझा । या जगीं असे ॥ त्वरित देई मज । सोडुनी कसें ॥

राम-जा निघुनी । चल इथुनी । धन्य दैवा मानोनी १

वीर—आज्ञा महाराज (जातो).

ऋ०—रामा पुरे कर. आतां तूं पाहिजे तें कर जा मी त्यांवर अवकृपा केली.

रा०—वचन द्या ह्मणजे जातों.

ऋ०—हें घे वचन (वचन देतो) (जातात).

(पडदा पडतो).

पा०—आह्मी त्यांचा इतका शोध केला तरी ते सांपडत नाहींत यावरून खास ते पळून गेले असावेत. कांहीं चिंता नाहीं पळालां ह्मणूनच वाचलां नाहीं तर यमसदनीं पाठविलेंच असतें.

अ०— पद. (मदन लाजतो मला० ही चाल)

**इंद्रही कांपतो मला बघून अंतरीं ॥ नाहीं असा शूर कोणी या जगावरी ॥**

(राम प्रवेश करून).

**राम—परंतु मारुनी तुला मीं आज संगरीं ॥ बिभीषणासी बैसविन राज्यीं खरोखरी ॥ १ ॥**

अ०—मानवा, आज तुझीं शंभर वर्षे पूर्ण भरलीं म्हणून समज. मी समजत होतों कीं, तूं पळालास येणेंकरून तुझें मरण वांचलें परंतु तुझें दैव ओढ घेतें त्याला तूं काय करशील.

(युद्ध होते व पाताळकेत कूश हस्तें मरतो.)

कू०—अधमा, आतां तुला कोणाचें स्मरण करणें असल्यास करून घे.

अ०— पद. (पदरीं घ्या तुम्ही० ही चाल).

**रक्षा गुरुजी तुम्हीं मजला ॥ दुष्टें मम प्रिय बंधु वधिला ॥ दया तीं ताता, कशी नये अतां ॥ येउनी तारा तुम्ही मजला ॥ १ ॥**

गुरुमहाराज या बाळकावर आज इतके निष्ठूर कां झालां. आपली आज्ञा मोडून आलों म्हणून कोप आला असेल तर या बाळकाचे अपराध पोटांत

घालून घेऊन रक्षावें. आतां अंत पाहूं नको.

पद. (मुक्त कराहो मला मुक्त कराहो० ही चाल)

दुःख होतें हो मला दुःख होतें हो ॥
या मानवा हातीं आज मरण येतें हो ॥
फार कष्टलों गुरुजी फार कष्टलों ॥
बंधुच्या दुःखानें मी फार शीणलों ॥
येउनि या समयीं तुम्हीं मुक्त करा मशीं ॥
पित्त खवळे कड कड कड कड कड पाहुनी यासीं ॥ १

(गुरुजी प्रवेश करून)

गु०— पद. (हा दुष्टे चांडाळिणी कैकयी० ही चाल)

सांग कोण तुज गांजितसे तो खचितची या-
सीं याच क्षणीं ॥ भेट द्याया तत्पित्रांची पा-
ठवितों मीं यमसदनी ॥

रा०—थेरड्या उगिच बडबडसी ॥ कां वचन
भंग तूं करिसी ॥ बहु ममता या पोरासी ॥
दावुना आज ती ऐसी ॥

अ०—गुरो रक्षी मला ॥ मम विनती तुला ॥
क्षमा करीं, अपराध जरी, मम घोर परी, तूं
समज मनीं ॥ बंधुशी लाथ, मारुनी घात,
करुनी विपिनांत, झाला शांत ॥

गु०—शक्तिहीन मी असें खचीतची वचन बद्ध
झालों म्हणुनीं ॥ १ ॥ (जातो).

अ०—हाय हाय गुरुजी सोडून तर गेलेच आतां
प्रसंग फार कठीण दिसतो.

कृ०—मुर्खा युद्ध करण्याचें सोडून असा रडत काय बसलास; युद्धास सिद्ध हो.

(युद्ध होतें व अलुटकेत मरतो).

(पडदा पडतो).

## प्रवेश २ रा.

रा०— पद. (चोर जार तूं असशी० ही चाल)

डरली नाहीं तुज भीती आतां शत्रूची साची ॥
या समयीं मी दिधली त्याला मुक्ति अखेरीची ॥
योगरूप तूं धरुनी सखया फारच शिणलासी ॥
सिंहासनी तूं बैसुनी आतां भोगी सौख्यासी ॥
दुर्गीं जाउनी सोडवी मंत्री वस्त्रें दे आजी ॥
सुखें राज्य तूं करुनी सखया राखी प्रजा राजी १

(जाऊन प्रधानास घेऊन येतो).

प्र०— पद.

धन्य धन्य धन्य प्रभो सुदिन उगवला ॥
आज पहा दुर्दिन हा पूर्ण संपला ॥
शत्रू वधुनी आज तुवां भक्त रक्षिला ॥
तव पदीं दास प्रभो लीन जाहला ॥ १ ॥

रा०—कल्याणमस्तु. बिभीषणा. साकी.

प्रसन्न झालों मागें आतां मनीं जें इच्छीसी ॥
पूर्ण करीन मी हेतू तव ते सांग सत्वरां मजशीं ॥
मागून घे आतां ॥ सखया विलंब नच करितां ।१।

बि०—महाराज आपल्या कृपेनें मला सर्व कांहीं आहे परंतु आपली इच्छा असल्यास मागतों.

रा०—पाहिजे तें माग. पुरविण्यास मी तयार आहे.

वि०— पद.

द्या द्या प्रभो तुम्ही मज इतुकें द्या ॥ दासावरी या प्रसन्न होउनी ॥ झडकरी आतां हें मज द्या, तुम्हीं इतुकें द्या ॥ धृ० ॥ धांवा करितां प्रसन्न होउनी ॥ येउनी मजला दर्शन द्या ॥ तुम्ही० ॥१॥ एक मास तुम्ही येथ राहुनी ॥ दासाला सेवा करूं द्या ॥ तुम्हीं इतुकें द्या ॥२॥

रा०—तुझी सर्व इच्छा पूर्ण होईल व

साकी.

चिरकाल तूं राज्य करींवा या तव लंके माजी ॥ पुत्र पौत्र समवेत नांद तूं प्रजा राखीतीं राजी ॥ लागुनीं हरी चरणीं ॥ राहीं भोगुनी सौख्य जनीं ॥ १ ॥

वि०— पद.

अहा आज सुदिन मला प्राप्त जाहला ॥ तव कृपे करुनी आज दास सुखी झाला ॥ धृ०॥ लंकातीं प्राप्त झाली पुनरपी मला ॥ कार्य भाग आज कितीं नामी जाहला ॥ आत्माराम सुखसागरीं पोहूं लागला ॥ १ ॥

( पडदा पडतो ).

समाप्त.